**सोलापूर विद्यापीठ**
सोलापूर पु ो महामा ि, ` ांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

**SOLAPUR UNIVERSITY**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com

**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/2015-16/** 7015 **Date:** 31 OCT 2015

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित संशोधन सुविधा केंद्र व ठिकाण,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या पीएच.डी. प्रवेशाबाबत.

संदर्भ : १) UGC (Minimum Standards and Procedure For Awards of M.Phil./Ph.D. Degree) Regulation 2009.
२) युजीसी, नवी दिल्ली यांचे दि. ६ जुलै, २०१५ चे पत्र क्र. D.O.No.F.-१०-६/२०११(PS)Misc.
३) युजीसी, नवी दिल्ली यांचे दि. ४ सप्टेंबर, २०१५ चे पत्र क्र. D.O.No.F.-१०-६/२०११(PS)Misc.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रांना अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ च्या SUS-PET-६-२०१५ साठी पीएच.डी. च्या मान्यता प्राप्त मार्गदर्शकांनी कळविलेल्या प्रवेश क्षमतेनुसार दि. २६ जुलै २०१५ रोजी पीएच.डी. प्रवेश परीक्षा घेण्यात आली. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती दि. १४ ऑक्टोंबर ते २८ ऑक्टोंबर २०१५ या दरम्यान घेण्यात आल्या.

दरम्यानच्या कालावधीत यु.जी.सी. नवी दिल्ली यांचे दि. ६ जुलै २०१५ चे पत्र विद्यापीठास प्राप्त झाले. सदर पत्रात खालील प्रमाणे कळविले आहे.

"Universities shall allocate the supervisor from amongst the regular faculty members in a department or its affiliated PG colleges/Institutes depending on the number of students per faculty member, the available specialization among the faculty supervisors and the research interest of the student. It further clarified that any Ph.D./M.Phil degree awarded by a University under the supervision of a supervisor who is not a faculty member of the University or its affiliated PG Colleges/Institutes would be in violation of UGC (Minimum standards and procedure for award of M.Phil./Ph.D.) Regulations,2009"

वरील पत्राच्या अनुषंगाने कांही विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाला विचारणा केल्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना दिनांक ०४/०९/२०१५ रोजी पत्र पाठवून (संदर्भ क्र.३) खालील प्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

"It has come to the notice of University Grants commission that some of the Universities are circumventing the provisions of UGC (Minimum standards and procedure for award of M.Phil./Ph.D.) Regulations, 2009 by utilising the services of Adjunct Faculty as Supervisors. It is reiterated for the information of the Universities that only regular faculty (not Adjunct Faculty) can be appointed as Research Supervisors.

In case of any aberration by the University, it will be proceeded against as per the UGC Act, 195 and the name of the University will be put in the defaulters list on the UGC website.

प्रस्तुत विद्यापीठाच्या अध्यापन व संशोधन मंडळाच्या (BUTR) निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.६/७/२०१५ रोजीच्या पत्रातील निर्देशाची अमंलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून करावयाची आहे.

संदर्भ क्र. २ व ३ नुसार सोलापूर विद्यापीठ अधिविभागातील मार्गदर्शकांना आणि सोलापूर विद्यापीठाच्या मान्यता प्राप्त पदव्युत्तर महाविद्यालयांतील / संस्थेतील पदव्युत्तर शिक्षक म्हणून नियुक्ती असणा-या मार्गदर्शकांनाच संशोधक विद्यार्थी देता येणार आहेत.

वरील निर्देश/निर्णयानुसार कार्यवाही करतांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी जाहीर केलेली पीएच.डी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता कमी होणार असल्यामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण (Clarification) मागविले असून ते प्राप्त होई पर्यंत पीएच.डी. प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही स्थगित करावी लागणार आहे.

विभागीय संशोधन समिती (DRC) समोर झालेल्या मुलाखतीनुसार वाणिज्य, शिक्षणशास्त्र, सामाजिकशास्त्र व विज्ञान या विद्याशाखेच्या मार्गदर्शक दिलेल्या (Guide Allotment) संशोधक विद्यार्थ्यांच्या यादया या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत तर उर्वरित विद्याशाखेच्या (अभियांत्रिकी, विधी, कला व ललित कला विद्याशाखेच्या तसेच पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स) यादया प्रसिध्द करावयाच्या आहेत.

**वरील परिस्थितीत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मार्गदर्शन प्राप्त होई पर्यंत SUS-PET-६-२०१५ पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात येत असून या संदर्भातील सविस्तर सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.**

सदरचे परीपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्राचार्य आर. वाय. पाटील)
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

टिप : सदर पत्राची प्रत संशोधक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.